डॉ. नंदिनी धारगळकर

# भविष्यकथनातील
# शंभर कानमंत्र



# भविष्यकथनातील
# शंभर कानमंत्र

डॉ. नंदिनी धारगळकर

ई साहित्य प्रतिष्ठान

# भविष्यकथनातील शंभर कानमंत्र

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे प्रकाशन कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा,व अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# भविष्यकथनातील शंभर कानमंत्र

**Dr. Nandini Dhargalkar**

M.D. Ph. D. (Ayurved)

**Contact:**

C/2 Anupam Complex

Karve Road, Kothrud, 411038

**Phone**: 7020511649, 9579031212

**Mail ID**: nan240950@gmail.com

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते . त्यांच्या पश्चात ते हक्क त्यांचे चिरंजीव अभिजीत धारगळकर यांचेकडे असतील.

**This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.**

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १८ जुलै २०२१ (आषाढ शुद्ध दशमी १९४३)

मुखपृष्ठ- सुनीळ सामंत

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

# डॉ. नंदिनी धारगळकर

## लेखिकेची थोडक्यात ओळख



- Ex-**Principal**, Rasiklal. M. Dariwal Ayurvedic college, Valsad, Gujarat 396375
- Ex-**Dean**, RMD Cancer Hospital, Waghaldhara, Valsad, Gujarat
- Ex-**H.O.D.** Sharira-Kriya Dept. Tilak Ayurved Mahavidyalaya, Pune
- Ex-Member, Adhock Committee, MUHS, Nashik
- Ex-Member, Academy, UG & PG, Para-clinical board, MUHS, Nashik
- Ex-Senior Vice Principal, Tilak Ayurved Mahavidyalaya, Pune
- Examiner & paper setter for UG & PG for last 32 years, Pune University & MUHS, Nashik
- Chief Co-ordinator, Autonomous Courses, ASM, Pune
- Academic faculty and Guide for UG and PG for Pune University & for MUHS
- Ph.D. Guide MUHS, Nashik
- Author of CCIM approved Sharira-Kriya book published by Chaukhambha Sanskrit Series Office, Varanasi
- CCIM syllabus setting 2010-12
- Professor Shrarir-Kriya till 2015 in ASM Pune
- Private consultancy on appointment from 2015 till date for alternative therapy on cardiac diseases
  - **SHARADINI DAHANUKAR BEST TEACHER AWARD WINNER 2006**
  - (MUHS Nashik)

# ज्ञानदानयज्ञ

माझे पति श्री दिलीप धारगळकर यांची खूप इच्छा होती की मी जसे सोप्या भाषेत ज्योतिषाचे व जपानी भाषेचे वर्ग घेत असे तशी काही पुस्तके काढावीत. पण मेडिकल डॉक्टर असल्याने वेळच मिळाला नाही. आता क्लिनिक बंद केल्यावर वेळ मिळाला पण कोविड १९ ने हैदोस घातला.

म्हणून हा ज्ञानदानयज्ञ.

यात ज्योतिष, आयुर्वेद, योग, ग्रंथवाचन, तसेच जपानी भाषेचे व्याकरण, संहिता भाषांतर अशा बाबींच्या पुस्तिकांचे हवन करून असे साहित्य आवडणाऱ्या वाचकवर्गाला तृप्त करावे हा विचार आहे.

श्री दिलीप धारगळकर



अचानकच हृदय बंद पडल्याने भर गुढीपाडव्याच्या शुभ दिनी दि. १३ एप्रिल २०२१ रोजी जीवनज्योत विझलेल्या माझ्या पतींच्या स्मृतीला माझा ह्या ज्ञानदानयज्ञाचा प्रथम हवनाविष्कार सादर अर्पण



डॉ. नंदिनी धारगळकर

# भविष्य कथनातील १०० कानमंत्र

ज्योतिष शिकतांना कुंडली सोडविण्यासाठी काही मूलतत्वे खूप उपयोगी पडतात. ती येथे या पुस्तिकेत संकलित करून दिली आहेत, यांचा नवागतांना खूपच फायदा होईल. कोणत्याही संभ्रमाच्या क्षणी यातील सोपे सोपे नियम उचलल्यास निश्चितच नवीनच ज्योतिषक्षेत्रात उतरलेल्या ज्योतिषाला भविष्य सांगतांना सोपे जाईल. अर्थातच येथे प्राथमिक ज्योतिषशास्त्राचे ज्ञान असणे अपेक्षित आहे

## १. कुंडलीच्या भावाचे मर्मस्थान:

१.१ प्रथम भावाचे मर्मस्थान स्वत: प्रथम भाव व प्रथम भाव + सप्तम भाव होय

१.२ द्वितीय भावाचे मर्मस्थान तृतीय भाव होय

१.३ तृतीय भावाचे मर्मस्थान पंचम भाव व द्वितीय भाव + अष्टम भाव होय

१.४ चतुर्थ भावाचे मर्मस्थान सप्तम भाव होय

१.५ पंचम भावाचे मर्मस्थान तृतीय भाव + नवम भाव होय

१.६ षष्ठम भावाचे मर्मस्थान पंचम भाव आणि द्वादश भाव + एकादश भाव होय

१.७ सप्तम भावाचे मर्मस्थान चतुर्थ व दशम भाव होय

१.८ तृतीय भावाचे मर्मस्थान पंचम भाव होय

१.९ नवम भावाचे मर्मस्थान पंचम व पंचम + एकादश भाव होय

१.१० दशम भावाचे मर्मस्थान सप्तम भाव होय

१.११ एकादश भावाचे मर्मस्थान दशम भाव आणि षष्ठ भाव + द्वादश भाव होय

१.१२ द्वादश भावाचे मर्मस्थान एकादश भाव आणि षष्ठ भाव + एकादश होय

२. पंचम स्थान वा पंचमेशावरून राहूचे भ्रमण असले तर बाकी स्थिति कितीही

चांगली असली तरी ज्योतिषाने जातकाच्या शिक्षणाविषयी कोणतेही निश्चित विधान करू नये. कारण राहू शिक्षणाच्या बाबतीत विचित्र अनुभव देवू शकतो.

३. धनस्थानाचे भविष्य पाहतांना प्रथम स्थान, ग्रह राशी नक्षत्र यांच्या कशा स्थितीत जन्म घेतला आहे याच्या अवलोकनासाठी; द्वितीय स्थान, कुटुंबाच्या अर्थस्थितीसाठी; अष्टम स्थान, सासुरवाडीचे धनस्थान म्हणून व एकादश स्थान, लाभस्थान म्हणून पहावे.

४.भाव निर्दोष कधी मानावा –

४.१ भावात शुभग्रह असल्यास

४.२ स्वामी शुभस्थानी असल्यास

४.३ स्वामी उच्चीचा असल्यास उत्तमच

४.४ शुभग्रहदृष्ट भाव असल्यास

४.५ पापग्रहांची दृष्टी भावावर वा स्वामीवर नसल्यास

४.६ पापकर्तरी योगात भाव नसल्यास

५.ग्रहांचे उदयकाल व त्याची वर्षे

५.१ गुरु — उदयकाल १६ वर्षे व त्याची वर्षे १६ ते २१

५.२ रवि — उदयकाल २२ वर्षे व त्याची वर्षे २२ ते २३

५.३ चंद्र — उदयकाल १६ वर्षे व त्याची वर्षे २४ ते २४

५.४ शुक्र — उदयकाल २५ वर्षे व त्याची
वर्षे २५ ते २७

५.५ मंगळ — उदयकाल २८ वर्षे व त्याची
वर्षे २८ ते ३१

५.६ बुध — उदयकाल ३२ वर्षे व त्याची
वर्षे ३२ ते ३५

५.७ शनि — उदयकाल ३६ वर्षे व त्याची
वर्षे ३६ ते ४३

५.८ राहु — उदयकाल ४२ वर्षे व त्याची
वर्षे ४२ ते ४७

५.९ केतु — उदयकाल ४८ वर्षे व त्याची
वर्षे ४८ नंतरची

६.क्रांतिकारक स्थाने — १, १०, ४ व ७
हे भाव क्रांतिकारक होत

७.हलाहल योग – रवि व शनि यांचा युतियोग / केंद्रयोग / प्रतियोग हलाहल योग निर्माण करतात. हा असह्य दु:ख देतो

८.शनि ग्रह हा मृत्यूचा कारक व पीडाकारक असला तरीही दैवाचा सितारा आहे. रवीच्या दशमात म्हणजे क्षितिजावरील शनि यश देणारच.

९.शनि चंद्रापासून ३, ६, ११ चांगला असतो. आयुष्य ६० वर्षे धरली तर तो १५ वर्षे चांगली देतो. बाकी पीडाकारक असतो.

१०. पापग्रह क्रांतिकारक स्थानांचा स्वामी असतो तेव्हाच काम करतो

११. ग्रह फल केव्हा देतात —

११.१ रवि जन्मचंद्रापासून ३,६,१०,११

११.२ चंद्र जन्मचंद्रापासून १,३,६,७,१०,११

११.३ मंगळ जन्मचंद्रापासून ३,६,११

११.४ बुध जन्मचंद्रापासून २,४,६,८,१०,११

११.५ गुरु जन्मचंद्रापासून २,५,७,९,११

११.६ शुक्र जन्मचंद्रापासून १,२,३,४,५,८, ९, ११, १२

११.७ शनि जन्मचंद्रापासून ३,५,११

११.८ राहु व केतु जन्मचंद्रापासून ३,६,१०,११

१२. ग्रह किती अंशावर फल देतात —

१२.१ रवि व मंगळ — १ ते १० अंश

१२.२ गुरु व शुक्र — ११ ते २० अंश

१२.३ चंद्र व शनि — २१ ते ३० अंश

१२.४ बुध व राहु संबधित राशीस्वामींप्रमाणे फल देतात

१३. नक्षत्रांचे स्वभावाप्रमाणे व ग्रहगुणांप्रमाणे वर्गीकरण:

१३.१ ध्रुव वा स्थिर नक्षत्रे/रविगुणधर्म — रोहिणी, उफा, उषा, उभा

१३.२ चर नक्षत्रे/चंद्रगुणधर्म — पुनर्वसु, स्वाती, श्रवण, धनिष्ठा, शततारका

१३.३ उग्र वा क्रूर नक्षत्रे/मंगळ गुणधर्म —भरणी, मघा, पूषा, पूभा, पूफा

१३.४ मिश्र वा साधारण नक्षत्रे/बुध गुणधर्म — कृत्तिका, विशाखा

१३.५ क्षिप्र वा लघु नक्षत्रे/गुरु गुणधर्म — आश्विनी पुष्य हस्त

१३.६ मृदु वा मैत्र नक्षत्रे/शुक्र गुणधर्म — मृगशीर्ष, चित्रा, अनुराधा, रेवती

१३.७ तीक्ष्ण वा दारूण नक्षत्रे/शनि गुणधर्म — आर्द्रा, आश्लेषा, ज्येष्ठा, मूळ

१४. चंद्र—शुक्र युतीत वा समसप्तकात असता त्यांच्यावर जर मंगळ दृष्टी टाकत असेल तर घटस्फोट होण्याची शक्यता असते.

१५. मंगळ—शुक्र युतीत असतील पण मंगळाची चौथी दृष्टी चंद्रावर पडत असेल तर सुद्धा घटस्फोट होण्याची शक्यता असते.

१६. केन्द्रस्थानानंतरचे प्रत्येक स्थान हे धनस्थान असते. १,४,७,व १० ही

केंद्रस्थाने होत. यामुळे २,५,८, व ११ ही स्थाने धनस्थाने होत. २ हा भाव पिढीजात येणारे धन प्रामुख्याने दर्शवितो. ५ हा भाव सहज किंवा विनाश्रमाचे पैसे उदा लॉटरी इ दर्शवितो. ८ हा भाव सासुरवाडीकडून येणारे धन दर्शवितो व ११ हे स्वकर्तृत्वाचे धन दर्शवितो.

१७. ही धनस्थाने धन कधी देतात तर पंचम भाव जागृत झाल्यावर देतात. पंचम भाव जागृत कधी होतो तर गुरु पंचमात असल्यास त्याला प्राणप्रतिष्ठा मिळते. तसेच पंचमेश गुरुदृष्ट असल्यास तसेच अनुभव येतात.

त्याचप्रमाणे योगकारक ग्रह शुभयोगात असतांना धन देतात

१८. गुरु शनि प्रतियोग म्हणजे दैव व कर्माचा प्रतियोग. अशा वेळी खूप कष्टकारी जीवन जगावे लागते.

१९. मंगळावर शनीची दृष्टी असल्यास आयुष्यात खूप नाटकी प्रसंगांना तोंड देण्याचे प्रसंग उद्भवतात.

२०. शनिदृष्ट मंगळ संयमी असतो.

२१. ज्या भावात अधिक ग्रह असतात तो भाव साधारणत: बलवान असतो.

२२. ज्याचे ३,६,१०, व ११ हे भाव बलवान असतात तो सर्वसाधारणपणे व्यवसायास योग्य असतो.

२३. अंतर्दशास्वामी जर ६,८,१२व्या भावाच्या नक्षत्रात असेल तर जातकाचा कायम तोटा होतो.

२४. एकादश भावावरून गोचरीचा कोणताही ग्रह गेल्यास तो कायम लाभच देतो.

२५. वृषभ तुला राशीचा शनि मंगळाच्या नक्षत्रात मारक ठरतो.

२६. शनि कोणत्याही नक्षत्रात असो; मकर कुंभ राशीच्या भावाचे कर्म करतो.

२७. ज्याची सिंह रास ग्रहहीन असते अशा जातकाने व्यवसायाचा विचार करू नये.

२८. दशमातील राहु जातकाला मोठे निश्चित करतो पण असत्याच्या जोरावर करतो

२९. ज्यावेळी भाव वा भावेश बिघडतो म्हणजेच दोषी बनतो तेव्हा भावचिंता निर्माण होते. निर्दोष असणे याचा अर्थ मुद्दा क्र ४ मध्ये विस्तृत दिला आहे.

३०. दशा, ग्रहगोचर, नक्षत्रगोचर व राशीगोचर यांवरून भविष्याचा मुख्य अंदाज घ्यावयाचा आहे. अशा वेळी इच्छित भाव लग्नी आणून पत्रिका पाहणे इष्ट.

३१. ज्या ग्रहाची दशा असेल तो ग्रह भविष्य सांगतांना लग्नी आणावा.

३२. नक्षत्रगोचर चंद्रापासून न पाहता तो ग्रह कोणत्या नक्षत्रात आहे त्या नक्षत्रगोचरीपासून पहावा

३३. कृत्तिका नक्षत्रातील कोणताही ग्रह जातकाची दाणादाण उडवतो

३४. अष्टकवर्ग पाहतांना:

३४.१ अंशात्मक ग्रहगणितावर अवलंबून असल्याने जन्मवेळ निश्चितच बरोबर पाहिजे

३४.२ प्रत्येक भावात ५६ बिंदु यातील काही शुभ काही अशुभ असतात. सर्वप्रथम भावबल पहावे.

३४.३ शुभबिंदु कमी असल्यास त्या भावाचे फल मिळत नाही

३४.४ एकादे स्थान बलवान असल्यास त्याचा षष्ठ भाव निर्बली ठरतो.

३४.५ स्वत:च्या लायकीच्या पेक्षा हलक्या पदावर काम करणारा जातक लग्न, चंद्र रवि अत्यंत कमी गुण असणारा असतो.

३४.६ गोचरीचे ग्रह कमी बिंदूंवरून जातांना जातकास धक्का देतात

३५. पत्रिकेतील ६,८, व १२ भावात कोणतेही ग्रह नसल्यास जातकाच्या इच्छापूर्तीचा मार्ग फारसा कष्टदायी नसतो

३६. ज्यांच्या उपयचस्थानात म्हणजे ३,६,१०, व ११ या भावात बुध गुरु शुक्र

हे ग्रह असतात असे जातक बरी भरभराट करून घेतात

३७. जातकाच्या धर्म, कर्म, लाभ भाव म्हणजेच ९,१०,११ मध्ये ३ पेक्षा अधिक ग्रह एकत्र असल्यास पूर्वायुष्य कसेही जावो, उत्तरार्ध यशदायी असतो.

३८. चंद्राच्या धनात शनि असल्यास जातकाचे कर्म पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणे तेजस्वी व स्वच्छ असते.

३९. धनेश ज्या ग्रहांशी योग करतो तशी धनप्राप्ति होते. मित्र, अध्यात्म, पुस्तके, समाजातील स्थान, हीही एक प्रकारची ऐश्वर्य किंवा धनप्राप्तिच होय. परंतु पैशाच्या दृष्टिकोणातून धनप्राप्ति

पाहण्यासाठी २ व ११ हीच खरी धनस्थाने. यांचा संबंध केंद्रभावांशी अर्थातच १,४,७, व १० शी वा कोणभाव अर्थातच ५ व ९ शी आल्यास धनप्राप्ति निश्चित होते.

४०. पूरक भाव म्हणून ८व्या भावाचा विचार करणे देखिल संयुक्तिक आहे कारण सासुरवाडीचे धन हा भाव दर्शवितो

४१. चंद्र + मंगळ, वा मंगळ + गुरु हा लक्ष्मी योग आहे. तसाच गजकेसरी योगही लक्ष्मी योग आहे ज्यात चंद्र व गुरु युतीत, केंद्रयोगात वा लाभयोगात असतात.

४२. काही कल्पना:

४२.१ प्लूटो = शनि + राहु + मंगळ

४२.२ नेपच्युन = चंद्र + गुरु + राहु

४२.३ हर्षल = बुध + बुध + बुध

४३. शनि ग्रह जरी पापग्रह मानला असला तरी धनसंचयास उत्तम

४४. पंचमेश गुरूपासून ६,८,१२ स्थानी असून लग्न, पंचम व नवम स्थानाचे स्वामी ६,८,१२ भावात असतील तर संतती न होण्याची शक्यता जास्त असते.

४५. शनि मंगळ युति वा प्रतियुतीत गुरु असेल तरी संतती होण्याची शक्यता कमी

४६. जन्मलग्नकुंडलीत बुधाच्या उच्च अशा कन्या राशीत वक्री शनि असल्यास

काकवंध्यायोग म्हणतात. अशा जातकास एकच संतती होते

४७. कोणताही ग्रह ३ व ११ स्थानी बलवान मानावा

४८. राशीफलापेक्षा भावफले बलवान समजावीत

४९. भावाचे बल समजण्यासाठी भावफल गणित हा तर एक उपाय आहेच पण अजून एक उपाय म्हणजे सर्वाष्टकवर्ग कुंडली. यात जरी प्रतिग्रहाचे शुभबिंदु समजत नसतील तरी भावबल मात्र स्पष्ट होते ते असे:

- यात कोणत्याही भावाला २८ शुभबिंदु असतील तर तो भाव समतोल अशी फळे देतो.
- भावात जर २८ पेक्षा कमी शुभबिंदु असतील तर भाव निर्बली होतो
- २८ पेक्षा अधिक शुभबिंदु असतील तर भाव बलवान होतो

५०. कोणताही भावेश त्याच भावात असता पूर्ण फले देतो

५१. नीच ग्रह शत्रुक्षेत्रात असलेला ग्रह अथवा पापग्रहाचे राशीत असलेला ग्रह हा राशी निर्बली मानावा

५२. त्रिक स्थानाचा स्वामी असलेला वा त्रिक स्थानात विराजमान ग्रह स्थान निर्बली मानावा

५३. लग्नेश पापग्रह असेल वा तो लग्नी असेल वा १ ते ६ अंश पर्यंतचा चंद्र लग्नी असेल तर अशी व्यक्ती रोगी असते

५४. पंचमात क्षीणचंद्र (३ अंशाखालील) व लग्नाच्या ७,१२ स्थानात पापग्रह असल्यास जोडीदार व पुत्र दोघांचेही सुख मिळत नाही.

५५. सप्तमात शुक्र मंगळ असतील तर वैवाहिक जीवनात किरकोळ मतभेद सतत होतात.

५६. मारकेश — २ व ७ स्थाने मारक स्थाने होत. ७ पेक्षा २ अधिक मारक होय. मात्र रवि चंद्र हे मारक स्थानाचे स्वामी असता त्यांना हा दोष लागत नाही. मिथुन लग्नाला चंद्र व कर्क लग्नाला रवि मारक ठरत नाही. ज्या ग्रहांना दोन राशी आहेत त्यांची एक राशी मारक स्थानी असून दुसरी केंद्र कोणात असेल तर तो ग्रह मारक ठरत नाही.

५७. बाधकेश — चर लग्नाला (१,४,७,१०) लाभेश बाधक; स्थिर लग्नाला (२,५,८,११) भाग्येश बाधक; व द्विस्वभावी लग्नाला (३,६,९,१२) सप्तमेश बाधक असतो

५८. खरेश – २२ व्या द्रेष्काणाचा स्वामी खरेश असतो. अष्टमेश, अष्टमातील ग्रह, लग्नापासून २२व्या द्रेष्काणाचा स्वामी व लग्नापासून ६४व्या नवमांशाचा स्वामी हे खरेश होत.

५९. बाधकेश खरेश व मांदिस्थित राशीस्वामी हे अतिशय त्रासदायक असतात.

६०. गुरु शनीसारखे बलवान बलवान ग्रह ज्यावेळी ज्यावेळी लग्नेश, भाग्येश, दशमेश, लाभेशाच्या आठवे येतात त्यावेळी चालू आयुष्यास काहीतरी वेगळेपण मिळून नव्या घटनांची मालिका सुरू होण्याची शक्यता असते.

६१. शनीचा पूर्वायुष्यावर प्रभाव नसतो उत्तरायुष्यात मात्र याच्या प्रभावाखाली आयुष्य व्यतीत होत असते.

६२. शनीच्या शुभत्वामुळे व्यक्तीची कार्यपद्धति, घेतलेले काम झटून पूर्ण करण्याच्या रीतीमुळे ती व्यक्ती कर्तबगार व कार्यकुशल ठरते. ही व्यक्ती कोणतेही काम पूर्ण विचारांती हातात घेते व ते योजनाबद्ध रीतीने तडीस नेते.

६३. सर्व धार्मिक कार्ये शनीच्या अंमलाखाली होतात व भिक्षु, संत, धर्मगुरू यांच्या वर शनीच्या प्रामाणिकपणाचा प्रभाव असतो.

६४. मात्र दूषित शनि व्यक्तीला दुराग्रही, दुराभिमानी, निष्ठुर व लोकांना लुबाडणारा बनवितो.

६५. भविष्य सांगतांना ग्रहांच्या पाचकादि अवस्था विसरल्या जातात. त्या खाली आठवणीसाठी दिल्या आहेत

६६. पाचक ग्रह:कोणत्या ग्रहांना पाचक म्हणता येते—

- रविपासून ६ वा शनि, चंद्रापासून ७ वा शुक्र, मंगळापासून २ रा रवि, बुधापासून २ रा चंद्र, गुरूपासून ६ वा शनि, शुक्रापासून २ रा मंगळ, शनीपासून ३ रा शुक्र हे ग्रह पाचक होत

- रवि, चंद्र व गुरु यांचा तो शत्रु असतो बाकीचे मित्र
- शत्रु असता स्थावर संपति यांचा विनाश व पीडा; मित्र असता उच्च दर्जाची वस्त्रे, संपति अन्नधान्य ऐश्वर्य यांचा लाभ होतो

६७. बोधक ग्रह: कोणत्या ग्रहांना बोधक म्हणता येते—

- रविपासून ७ वा मंगळ, चंद्रापासून ९ वा मंगळ, मंगळापासून ६ वा चंद्र, बुधापासून ४ था गुरु, गुरूपासून ५ वा मंगळ, शुक्रापासून ६ वा बुध, शनीपासून ११ वा चंद्र हे ग्रह बोधक होत

- बुधाचा तो शत्रु असतो बाकीचे मित्र
- मित्र असता अधिकारप्राप्ति, उच्च शिक्षण, सरकार दरबारी आदर, मान सन्मान, विनोदी बुद्धी, धार्मिकता यांचा लाभ होतो;शत्रु असता या सर्वांचा विनाश

६८. कारक ग्रह: कोणत्या ग्रहांना कारक म्हणता येते —

- रविपासून ९ वा गुरु, चंद्रापासून ११ वा शनि, मंगळापासून ११ वा शनि, बुधापासून ५ वा शुक्र, गुरूपासून ७ वा चंद्र, शुक्रापासून १२ वा रवि, शनीपासून ६ वा गुरु हे ग्रह कारक होत

- शुक्र आणि शनीचा तो शत्रु असतो बाकीचे मित्र
- मित्र असता आलटून पालटून सर्वसाधारण संपति व दारिद्र्य यांचा लाभ होतो;शत्रु असता जीवन सुखी होते

६९. वेधक ग्रह: कोणत्या ग्रहांना वेधक म्हणता येते –

- रविपासून ११ वा शुक्र, चंद्रापासून ३ रा रवि, मंगळापासून १२ वा बुध, बुधापासून ३ रा मंगळ, गुरूपासून १२ वा रवि, शुक्रापासून ४ था शनि, शनीपासून ७ वा मंगळ हे ग्रह वेधक होत

- मंगळ, गुरु, शुक्राचा तो शत्रु असतो बाकीचे मित्र
- मित्र असता नकारात्मक असल्याने त्रासदायक ठरतो;शत्रु असता जीवन सुखी होते

७०. ग्रहांच्या अवस्था पाहून सांगितलेले भविष्य निश्चितच अचूकते कडे झुकते ते पुढीलप्रमाणे

७१. ग्रह फलासाठी जागृतादि अवस्था

- राशीचे ३ भाग केल्यास प्रत्येक भागात जागृत स्वप्न व सुषुप्ति अशा ३ ग्रहावस्था मानल्या आहेत — जागृतावस्थेत कार्यसिद्धि, स्वप्नासस्थेत मध्यम फल व

सुषुप्ति असतांना निष्फळ अशी ग्रहफळे असतात

- विषम राशीत पहिले १० अंश जागृत; नंतरचे १० अंश स्वप्न; शेवटचे १० अंश सुषुप्ति
- सम राशीत पहिले १० अंश सुषुप्ति; नंतरचे १० अंश स्वप्न व शेवटचे १० अंश जागृत

७२. दीप्त, स्वस्थ, प्रमुदित, शान्त, दीन, अतिदु:खित, विकल, खल, कोपी या बृहत्पाराशरहोराशास्त्रातील अवस्था अशा—

- जो ग्रह परम उच्च राशीत असतो तो — दीप्त

- स्वोच्च ग्रह – स्वस्थ
- अतिमित्राच्या राशीत – मुदित
- मित्रराशीत – शान्त
- सम राशीत – दीन
- शत्रु राशीत – दु:खी
- बरोबर पापग्रह असल्यास – विकल
- अतिपापग्रह असल्यास – खल
- रविबरोबर असल्यास – कोपी

७३. उच्चीचे ग्रह जर ६,८,१२ स्थानी असतील तर ते अत्यंत अशुभ फले देतात.

७४. समसप्तकातील चंद्र शनि मनाला दुबळे बनवितात

७५. बुध–राहु युति अशुभ योगात असेल तर बुद्धि विकृति वा बुद्धिभ्रंशता दर्शवते

७६. ग्रहाची मूलत्रिकोणराशी व स्वराशी कशी ओळखावी—

- सिंह राशीत सूर्य २० अंशापर्यंत मूलत्रिकोण राशीत व नंतर स्वराशीत समजावा
- वृषभ राशीत चंद्र ३ अंशापर्यंत उच्च समजावा बाकी मूलत्रिकोण राशीत समजावा
- मेष राशीत मंगळ १२ अंशापर्यंत मूलत्रिकोण राशीत समजावा बाकी स्वराशीत समजावा
- कन्या राशीत बुध १५ अंशापर्यंत उच्च समजावा; पुढील ५ अंशापर्यंत

मूलत्रिकोण राशीत समजावा; बाकी उरलेल्या १० अंशापर्यंत स्वराशीत समजावा

- धनु राशीत गुरु १० अंशापर्यंत मूलत्रिकोण राशीत समजावा; बाकी उरलेल्या २० अंशापर्यंत स्वराशीत समजावा
- तुला राशीत शुक्र १५ अंशापर्यंत मूलत्रिकोण राशीत समजावा; बाकीच्या १५ अंशापर्यंत स्वराशी समजावी
- कुंभ राशीत शनि २० अंशापर्यंत मूलत्रिकोण राशीत समजावा; बाकीच्या १० अंशापर्यंत स्वराशी समजावी

७७. ग्रहाच्या अवस्था पाहण्यासाठी ग्रहमैत्री पाहणे आवश्यक असते. ही ग्रहमैत्री नैसर्गिक, तात्कालिक दोन्ही पहावी लागते. त्याचे कोष्टक सतत लागते ते असे:

नैसर्गिक मैत्री विचार

| ग्रह | मित्र | सम | शत्रु |
|---|---|---|---|
| सू | चं मं गु | बु | शु श |
| चं | सू बु | मं गु शु श | — |
| मं | र चं गु | शु श | बु |
| बु | र शु | मं गु श | सू शु |
| गु | र चं मं | श | बु शु |
| शु | बु श | मं गु | र चं |
| श | बु शु | गु | र चं मं |

७८. तात्कालिक मैत्री विचार

| ग्रह | मित्र | शत्रु |
|---|---|---|
| सू<br>चं<br>मं<br>बु<br>गु<br>शु<br>श | जे ग्रह २,३, ४, १०, ११, १२ भावात असतील ते परस्पर मित्र असतात | जे ग्रह १,५, ६, ७, ८, ९ भावात असतील ते परस्पर शत्रु असतात |

७९. नैसर्गिक व तात्कालिक मैत्री संबंधास पंचधा मैत्री म्हणतात

- नै मित्र + ता मित्र = अतिमित्र
- नै शत्रु + ता शत्रु = अतिशत्रु

- नै सम + ता मित्र = मित्र
- नै सम + ता शत्रु = शत्रु

८०. धूमादि अप्रकाशग्रह — हे अप्रकाशग्रह जर लग्नी वा चंद्राबरोबर असेल तर वंशाचा, आयुष्याचा, वैभवाचा, ज्ञानाचा नाश करतात.

- धूम — स्पष्ट सूर्यामध्ये ४।१३।२० मिसळले तर जे अंशादि मिळतात तो धूमग्रह होय
- व्यतीपात — धूमग्रह अंशादि मधून १२ राशी उणे केल्या तर व्यतीपात हा अप्रकाशग्रह मिळतो

- परिवेष — व्यतीपातात ६ राशी मिळविल्या तर परिवेष हा अप्रकाशग्रह मिळतो
- इंद्रचाप — परिवेषातून १२ राशी उणे केल्या तर इंद्रचाप हा अप्रकाशग्रह मिळतो
- ध्वज — इंद्रचापात १६।४० मिळविले तर ध्वज हा अप्रकाशग्रह मिळतो

८१. गुलिकादि भाग — दिनमानाचे ८ भाग करावेत. वाराच्या स्वामीपासून ८ वा भाग निरीश असतो. आधीच्या ७ भागांपैकी शनीच्या भागास गुलिक म्हणतात; गुरूच्या भागाला यमघंटक म्हणतात; मंगळाच्या भागाला मृत्यु

म्हणतात; सूर्याच्या भागाला कालवेला म्हणतात; आणि बुधाच्या भागाला अर्धयाम म्हणतात

८२. राशीदृष्टिचा विचार —

- मेष राशी सिंह, वृश्चिक व कुंभेकडे पाहते
- वृषभ राशी कर्क मकर व तुलेकडे पाहते
- मिथुन राशी कन्या धनु व मीनेकडे पाहते
- कर्क राशी वृषभ वृश्चिक व कुंभेकडे पाहते
- सिंह राशी मेष तुला व मकरेकडे पाहते

- कन्या राशी मिथुन धनु व मीनेकडे पाहते
- तुला राशी वृषभ सिंह व कुंभेकडे पाहते
- वृश्चिक राशी मेष कर्क व मकरेकडे पाहते
- धनु राशी मिथुन कन्या व मीनेकडे पाहते
- मकर राशी वृषभ सिंह व वृश्चिकेकडे पाहते
- कुंभ राशी मेष कर्क व तुलेकडे पाहते
- मीन राशी मिथुन कन्या व धनुकडे पाहते

८३. ग्रहदृष्टि जर पूर्ण असेल तर २० विश्वा मानली आहे. पंचांगात जी एकपाद दृष्टि देतात ती ५ विश्वा आहे. द्विपाद दृष्टि १० तर त्रिपाद दृष्टि १५ विश्वा आहे. पूर्ण दृष्टि ही चारपाद वा २० विश्वा आहे.

- शनि त्रिकोणात त्याच्यापासून म्हणजे ५ व ९ भावांवर एकपाद म्हणजे ५ विश्वा दृष्टि टाकतो; चतुरस्त्र म्हणजे ४ व ८ भावांवर द्विपाद म्हणजे १० विश्वा दृष्टि टाकतो; ७ व्या भावावर त्रिपाद म्हणजे १५ विश्वा दृष्टि टाकतो व त्रिदश म्हणजे ३ व १० भावांवर

पूर्ण म्हणजे २० विश्वा दृष्टि टाकतो (बृहत्पाराशरहोराशास्त्र)

- गुरु चतुरस्त्र म्हणजे ४ व ८ भावांवर एकपाद म्हणजे ५ विश्वा दृष्टि टाकतो; ७ व्या भावावर द्विपाद म्हणजे १० विश्वा दृष्टि टाकतो; त्रिदश म्हणजे ३ व १० भावांवर त्रिपाद म्हणजे १५ विश्वा दृष्टि टाकतो व त्रिकोण म्हणजे ५ व ९ भावांवर पूर्ण म्हणजे २० विश्वा दृष्टि टाकतो (बृहत्पाराशरहोराशास्त्र)
- मंगळ ७ व्या भावावर एकपाद म्हणजे ५ विश्वा दृष्टि टाकतो; त्रिदश म्हणजे ३ व १० भावांवर द्विपाद म्हणजे १०

विश्वा दृष्टि टाकतो; त्रिकोण म्हणजे ५ व ९ भावांवर त्रिपाद म्हणजे १५ विश्वा दृष्टि टाकतो व चतुरस्त्र म्हणजे ४ व ८ भावांवर पूर्ण म्हणजे २० विश्वा दृष्टि टाकतो (बृहत्पाराशरहोराशास्त्र)

- इतर ग्रह त्रिदश म्हणजे ३ व १० भावांवर एकपाद म्हणजे ५ विश्वा दृष्टि टाकतात; त्रिकोण म्हणजे ५ व ९ भावांवर द्विपाद म्हणजे १० विश्वा दृष्टि टाकतात; चतुरस्त्र म्हणजे ४ व ८ भावांवर त्रिपाद म्हणजे १५ विश्वा दृष्टि टाकतो व ७ व्या भावावर पूर्ण

म्हणजे २० विश्वा दृष्टि टाकतो (बृहत्पाराशरहोराशास्त्र)

- पंचांगात यापेक्षा वेगळी दृष्टि सांगितली आहे. परंतु प्रत्यक्ष कुंडली सोडवितांना वरील मत अधिक पटते

८४. मुंथा म्हणजे लग्नबिंदु. सांप्रत स्थितीतील मुंथा शोधण्यासाठी पद्धति:

- गताब्ध म्हणजे लग्नबिंदूनंतर संपलेली वर्षे
- गताब्ध + लग्नराशी = मुंथा राशी
- याचा आकडा १२ पेक्षा अधिक असल्यास १२ ने भागावे

- बाकी शून्य आल्यास मीन राशी अन्यथा येईल ती बाकी मुंथा राशी
- ही अत्यंत कष्टदायी असते
- हे कष्ट दूर करण्यासाठी मुंथास्वामीचे जप वा दाने सांगितली आहेत

८५. बुध, गुरु वा शुक्र यातील एक जरी ग्रह केंद्री असेल तरी माता वा पिता यांवरील जातकजन्माने येणारे अरिष्ट टळते.

८६. लग्नेश बलवान असून केंद्री असेल तरी अरिष्टभंग योग होतो.

८७. शुभग्रह केंद्र कोणात असतील तर सर्व प्रकारचे अरिष्ट दूर होतात.

८८. अर्गला योग –

- २, ४, व ११ व्या स्थानात असणारे ग्रह अर्गला योग निर्माण करतात.
- ३ भावात अनेक पापग्रह असतील व ते षड्वर्गात पापग्रहांच्या वर्गात असतील तसेच पापग्रहदृष्ट असतील तरी ते अर्गला योग निर्माण करतात
- अर्गला योगाचे बाधक भाव असे आहेत – द्वितीय भावाचा बाधक द्वादश भाव; चतुर्थ भावाचा बाधक दशम भाव; एकादश भावाचा बाधक तृतीय भाव

८९. कारक ग्रह –

अंशादिकांनी होणारे चरकारकत्व:

- ज्या ग्रहाचे अंश कला विकला इतर सर्व ग्रहांपेक्षा सर्वाधिक असतात त्या ग्रहाला आत्माकारक ग्रह म्हणतात. याला कारकराज असेही म्हणतात
- ज्या ग्रहाचे अंश कला विकला इतर सर्व ग्रहांपेक्षा सर्वात कमी म्हणजे न्यून असतात त्या ग्रहाला अंत्यकारक ग्रह म्हणतात.

  आत्माकारक ग्रह ठरला नाही तर अंत्यकारक ग्रहही ठरू शकत नाही. यासाठी आत्माकारकग्रह ठरवावाच लागतो
- आत्माकारक ग्रहानंतर ज्या ग्रहाचे अंश कला विकला उरलेल्या ग्रहांपेक्षा

अधिक असतात त्या ग्रहाला अमात्यकारक ग्रह म्हणतात

- अमात्यकारक ग्रहानंतर ज्या ग्रहाचे अंश कला विकला उरलेल्या ग्रहांपेक्षा अधिक असतात त्या ग्रहाला भ्रातृकारक ग्रह म्हणतात
- भ्रातृकारक ग्रहानंतर ज्या ग्रहाचे अंश कला विकला उरलेल्या ग्रहांपेक्षा अधिक असतात त्या ग्रहाला मातृकारक ग्रह म्हणतात
- मातृकारक ग्रहानंतर ज्या ग्रहाचे अंश कला विकला उरलेल्या ग्रहांपेक्षा अधिक असतात त्या ग्रहाला पुत्रकारक ग्रह म्हणतात

- पुत्रकारक ग्रहानंतर ज्या ग्रहाचे अंश कला विकला उरलेल्या ग्रहांपेक्षा अधिक असतात त्या ग्रहाला ज्ञातिकारक ग्रह म्हणतात
- ज्ञातिकारक ग्रहानंतर ज्या ग्रहाचे अंश कला विकला उरलेल्या ग्रहांपेक्षा अधिक असतात त्या ग्रहाला दारकारक ग्रह म्हणतात

९०. याव्यतिरिक्त पाराशरीत भावकारकत्व परस्पर कारकत्व देखिल सांगितले आहे.

९१. दत्तकपुत्रयोग –

- पुत्रभावात म्हणजेच पंचमात बुधाच्या राशी बुधयुक्त अथवा बुधदृष्ट

असतील व लग्नेश शनि असेल तर दत्तक पुत्रयोग होतो

- पंचमेश शनियुक्त, बुध मंगळदृष्ट व लग्नेश बुधाच्या नवांशात असेल तर दत्तक पुत्रयोग होतो
- सप्तमेश लाभस्थानी, पंचमेश शुभग्रहयुक्त असून पंचमात शनि वा बुध असेल तर दत्तक पुत्रयोग होतो
- पंचमेश चंद्र असून लग्नात वा पंचमात शनि असेल व गुरु पूर्ण बली असेल तर दत्तक पुत्रयोग होतो

- लग्नेश शुक्र उच्चीचा पंचमात शनी व पुत्रकारक ग्रह बलवान असेल तर दत्तक पुत्रयोग होतो

९२. मृत्यु जातकास सांगू नये असा ज्योतिष शास्त्राचा नियम आहे. तरीही शिक्षण म्हणून वा आयुर्दाय समजणे अनेक कारणानी आवश्यक असते. म्हणून काही काही नियम:

- जन्मकालीन चंद्र ज्या नवांशात असेल त्यापासून ६४ व्या नवांश राशीच्या लग्नात मृत्यु होतो
- सूर्य मंगळ शनि व राहु हे चार ग्रह मृत्यूच्या विषयात क्रमश: उत्तरोत्तर बलवान आहेत. या चार ग्रहात जो

बलवान असेल त्याच्या योगानुसार व्यक्तीला मृत्यु येतो.

- जी राशी दोन पापग्रहांच्या मध्ये असते तिच्या दशेत मृत्यु येतो
- जी राशी ८ वा १२ व्या भावात असते व तिच्या कडे निर्बली चंद्र दृष्टि टाकत असेल तर तिच्या दशेत मृत्यु येतो
- निर्बली चंद्र वा निर्बली शुक्राची दृष्टिदेखिल मृत्यूस कारणीभूत ठरू शकते
- रन्ध्रेश वा अष्टमेश ज्या दिशेस स्थित असेल त्या दिशेला मृत्यु होतो

९३. भविष्य सांगतांना राशीबल देखिल महत्वाचे:

- ग्रह असणे वा नसणे या वरून राशींची बलवत्ता ठरते.
- बल समान असेल तर चर स्थिर द्विस्वभावी राशी उत्तरोत्तर बलवान असतात
- राशी बलवान असेल तर सुख व निर्बली असेल तर दु:ख समजावे
- पाराशरी कालचक्र दशेनुसार १२ राशींची दशा आपापल्या स्वामींनुसार म्हणजेच ग्रहांनुसार सूर्यादि ग्रहक्रमाने ५,२१,७,९,१०,१६,४ अशी दशावर्षे

समजावीत. जन्मकाली जो नवांश असतो तिथून सुरुवात करून नवव्या नवांशापर्यंतच परमायु असते. मोजतांना –

- सव्य नक्षत्रे असतील तर प्रतिअंश पुढे मोजावे. सव्य नक्षत्रे – अश्विनी, पुनर्वसु, हस्त, मूळ, पूभा इ
- अपसव्य नक्षत्रे असतील तर प्रतिअंश मागे जावे. अपसव्य नक्षत्रे – रोहिणी, मघा, विशाखा श्रवण इ

९४. धनेश म्हणजेच द्वितीयेश ज्या दिशेस असेल त्या दिशेस धनप्राप्ति निश्चित होते

९५. जर एकादे काम विलंबित होत असेल व विलंबी शनि कारणीभूत असल्याचे दिसले तर सावळया व्यक्तीस वडा सांबार दही वडा असे उडिद असलेले पदार्थ खाऊ घालावेत

९६. मंगळ दोषी असल्यास गूळ व मसूर डाळ यांचे लाडू वा पदार्थ तांबडया गायीला वा बैलाला खाऊ घालावेत

९७. राहु—केतु बाधा करत असतील तर विशेषत: विवाह न होणे वा स्थळच न येणे वा तत्सम बाबींसाठी दर चतुर्थीला गणपतीच्या मंदिरात जावे

व रक्तगंध, रक्तपुष्प गूळ खोबरे अर्पून विघ्न दूर करण्याचे साकडे घालावे

९८. कुलदैवतेस मणिमंगळसूत्र दिल्यासही विवाहविलंब दूर होतो

९९. पितृदोष असल्यास अमावस्येला भात शिजवून दही घालावे व त्याचे तीन भाग करावेत. एक भाग गायीस एक भाग कुत्र्यास व एक भाग कावळयास घालावा

१००. दैवी शक्ती वाढविण्यास पंचमेश व लाभेश यांची उपासना उपयोगी पडते.

कव्हरवर फक्त एक क्लिक करा

पुस्तक ओपन होईल














Click any cover-

open that book










# नंदिनी धारगळकर यांची ई साहित्य प्रकाशित इतर


कव्हरवर फक्त एक

क्लिक करा

पुस्तक ओपन होईल








Click any cover-

open that book



**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे चौदावे वर्ष.**

**डॉ. नंदिनी धारगळकर यांचे ईसाहित्यवरचे हे चौदावे पुस्तक.**

डॉ. नंदिनी धारगळकर या एक ज्येष्ठ लेखिका. अनेक विषयांत त्यांचा अत्यंत सखोल अभ्यास आहे. मेडिकल फ़िल्दमधील व्यक्ती असल्यामुळे त्यांनी सर्वसामान्यांना उपयुक्त अशी मेडिकलच्या विषयातली सोपी पुस्तके लिहीली. तसेच ज्योतिष, कला या विषयांवरही अत्यंत अभ्यासपूर्ण पुस्तके लिहीली. त्यांना ही पुस्तके जास्तीत जास्त लोकांपर्यंत न्यायची होती म्हणून त्यांनी ई साहित्य हे माध्यम निवडले. एकाही पैशाची अपेक्षा न ठेवता त्यांनी उदार हस्ते ही पुस्तके आमच्या लाखो वाचकांना दिली. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर ई साहित्यवर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१२), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(८), डॉ. नितीन मोरे (२८), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(३), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (७), अशोक कोठारे (५० खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी

भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(२३), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (८), अंकुश शिंगाडे(१०), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(३) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(८), जगदिश खांदेवाले(४) असे अनेक ज्येष्ठ, अनुभवी लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत पोहोचवतात. एकही पैशाची अपेक्षा न ठेवता.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपले नाव नेऊन ठेवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।